# भारताच्या सुरक्षेला अंतर्बाह्य धोके

**भारतासारख्या खंडप्राय विशाल भूप्रदेशाच्या सुरक्षिततेचा प्रश्न म्हणजे काही हाऊसिंग सोसायटीतल्या फ्लॅटच्या संरक्षणाइतका सोपा नाही. सोसायटीच्या प्रवेशद्वारावर गुरखा ठेवला की काम भागते. भारताच्या सुरक्षिततेबाबत संरक्षण मंत्र्यांची अशीच कल्पना आहे काय?**

**डॉ. नी.र. वऱ्हाडपांडे**

नुकतीच बातमी आली आहे की चीनी सैन्याच्या काही तुकड्यांनी हिमाचल प्रदेशात प्रवेश केला आहे. ६२ च्या युद्धाने हे सिध्द केले की चीनी फौजेच्या तुकड्यांना बलपूर्वक हाकून लावण्याचा विचार देखील आम्ही मनात आणू शकत नाही. ६२ नंतर भारताने आपल्या सैन्याला बलशाली करण्याचा प्रयत्न केला अशी सर्वसामान्य समजूत आहे. पण ही समजूत किती यथार्थ आहे हे ६५ साली पाकिस्तानशी झालेल्या युद्धात दिसून आले. गोळीबंदी झाली तेव्हा पाकिस्तानने भारताचा खेमकरण व राजस्थानमधील काही भाग काबीज केला होता. हे प्रदेश पाकिस्तानच्या कबजातून सोडविणे भारतीय सेनेला शक्य झाले नाही. ते पुढे ताश्कन्द येथे आम्हाला पाकव्याप्त काश्मीरातला जो भाग आम्ही जिंकला होता तो मोकळा करायला लावून रशियाने त्याच्या मोबदल्यात आम्हाला परत करविला. तात्पर्य चीनविरुद्ध सैनिक तयारी करण्याचा तीन वर्षे जो प्रयत्न झाला तो पाकिस्तानचे आक्रमण यशस्वीरीतीने रोखू शकेल एवढाही प्रभावी नव्हता.

आता पाकिस्तानजवळ ९ अणुबॉम्ब व चीनने दिलेली अस्त्रे आहेत. आमचे पृथ्वी अस्त्र आता कुठे चाचणी पास झाले आहे व ते सैन्याच्या वापरात येण्यास अवधी आहे. आम्ही अशी अस्त्रे बनवू नयेत म्हणून अमेरिकेचा आमच्यावर दबाव चालू आहेच व त्याला न जुमानण्याइतके स्वावलंबित्व आमच्यात नाही.

चिमुकला इस्त्राएल सोडून आम्हाला मदत करायला कोणीही तयार नाही. चीनच्या वर्तनावरून तो आज भारत सामर्थ्यशाली नसला तरी पुढे मागे सामर्थ्यशाली होण्याची गर्भित क्षमता त्यात आहे हे ओळखून भारत कधीच सामर्थ्यशाली होऊ नये म्हणून पाकिस्तानला मदत करीत राहणार असे दिसते. म्हणजे मित्र व शस्त्रास्त्रे या दोन्ही बाबतीत भारत पाकिस्तानपेक्षा पंगू आहे.

आमची ही केविलवाणी दशा होण्याचे कारण नेहरूंनी अवलंबिलेली धोरणे हे होय. यात आज कुणाला संशय असेल असे वाटत नाही. चीनने तिबेटवर आपला हक्क सांगितला तेव्हाच चीनचे उद्देश भयावह आहेत याची कल्पना सरदार पटेल यांनी नेहरूंना दिली होती. सरदार पटेल यांनीच केवळ नव्हे तर गिरिजाशंकर बाजपेयींनी, तिबेटचे उदक चीनच्या हातावर सोडण्याचा जो तह १९५४ साली झाला तो करण्यापूर्वीच असा तह करताना तिबेटच्या सीमा कोणत्या हेही या तहात नमूद असावे असा सल्ला दिला होता. पण तो नेहरूंनी मानला नाही. चीनने तिबेटवर हक्क सांगितला तेव्हा तो मान्य करू नये व आपला हक्क अमान्य झाल्यास चीनने दमदाटी सुरु केल्यास आम्ही मदत करू असे अमेरिकेने व ब्रिटनने सूचित केले होते. रशियाला देखील चीन तिबेटमध्ये घुसावा हे पसंत नव्हते. तात्पर्य, चीनला तिबेटमध्ये घुसण्यास नेहरूंचा नुसता नकार पुरेसा ठरला असता. पण नेहरूंनी कुणाचेच ऐकले नाही. सीमाप्रश्नावरून चीन आपल्याशी लढाई करील असे नेहरूंना चीनने प्रत्यक्ष स्वारी करीपर्यंत वाटले नाही, एवढेच नव्हे तर चीनच्या लष्करी सामर्थ्याबद्दल देखील त्यांना अजीबात अंदाज नव्हता, हे त्यांनी मे.ज. उमरावसिंग यांना चीन फौजांना

'हाकून देण्याचा जो हूकूम सोडला त्यावरुन स्पष्ट आहे. उमरावसिंगांनी स्पष्ट सांगितले की चीनी फौजांना हाकून लावण्याचे सामर्थ्य भारतीय सैन्यात नाही. ते सामर्थ्य यावे म्हणून निदान सहा महिने वेळ व विशिष्ट प्रकारची शस्त्रास्त्रे लागतील. नेहरुंनी त्यांचे म्हणणे धुडकावून लावले व आपले आवडते सेनापति जनरल कौल यांना चीनी फौजेवर हल्ला करण्याचा हुकूम दिला. पुढे कौल यांची काय दुर्दशा झाली हे कुप्रसिद्ध आहे. नेहरुंनी असे वर्तन का केले ?

### 'राष्ट्रीय'राज्यकर्ता औरंगजेब

नेहरुंच्या वर्तनाचा उलगडा करायचा असेल तर जे अनेक मुद्दे लक्षात ठेवले पाहिजेत त्या पैकी एक हा की नेहरु हे विचाराने सर्वस्वी कम्युनिस्ट होते, ते कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य नव्हते हाच फक्त त्यांच्यात व इतर कम्युनिस्टात फरक होता. ब्रिटन हा भांडवलशाही देश असल्यामुळे आपण गांधींच्या त्याच्या विरुद्धच्या चळवळीत सामिल झालो, उद्या ब्रिटन कम्युनिस्ट झाले तर आपल्याला गांधीच्या चळवळीत स्वारस्य उरणार नाही असे त्यांनी आपल्या आत्मचरित्रात स्पष्टच म्हटले आहे. गांधींशी कोणत्याच बाबतीत पटत नसून ते गांधींना चिकटून राहिले याची दोन कारणे आहेत. नेहरु आदर्शवादी म्हणून वर्णिले जात असले तरी ते अत्यंत व्यवहारवादी होते व गांधीना सोडणे म्हणजे पुढारीपणाला मुकणे हे त्यांनी ओळखले होते. कम्युनिस्ट पक्षाला जाऊन मिळण्यात दुसरा धोका असा होता की, ब्रिटिश सरकार कम्युनिस्टांना कडकपणे वागवीत असे. कम्युनिस्ट पक्षात गेल्याने काँग्रेस चळवळीत उच्चपदस्थांना मिळणाऱ्या अ वर्गीय तुरुंगवासावर भागले नसते भाई डांग्याप्रमाणे खडी फोडण्याचा प्रसंग येऊ शकत होता. दुसरे असे की काँग्रेसमध्ये राहूनच आपण गांधींना कम्युनिस्ट बनवू शकू अशी त्यांना आशा होती व गांधींशी तासन् तास चर्चा करुन त्यांनी तसा प्रयत्नही केला.

४२ ची चळवळ करु नये कारण यावेळी रशिया ब्रिटनचा दोस्त आहे व ब्रिटनविरुद्ध चळवळ केल्यास रशिया अडचणीत येईल असे नेहरुंचे मत असल्याचे प्रसिद्ध आहे.

नेहरु कम्युनिस्ट होते हे लक्षात घेतले की नेहरु चीनशी वागले तसे का वागले याचा उलगडा होतो. चीन हा कम्युनिस्ट देश आहे व कम्युनिस्ट देशाचे आक्रमण हे परकीय आक्रमण नसून विमोचन आहे असे इतर कम्युनिस्टाप्रमाणेच नेहरुंचेही मत होते. फरक एवढाच होता की इतर कम्युनिस्ट भारतात सत्तास्थानी नव्हते, उलट नेहरु भारताचे पंतप्रधान होते. त्यामुळे चीनचे भारतावरील आक्रमण हे आपल्यावरील आक्रमण नाही अशी बतावणी करणे त्यांना शक्य नव्हते. चीनने प्रत्यक्ष आक्रमण करीपर्यंत आपण पंतप्रधान आहोत तोपर्यंत चीन भारतावर आक्रमण करणार नाही अशी त्यांची खात्री होती.

चीनच्या ऐवजी दुसरा एखादा 'भांडवलशाही' देश असता तर नेहरुंनी त्याची तिबेटवरील सत्ता मान्य केली नसती. इण्डोनेशियावरील डचांची सत्ता व गोव्यावरील पोर्तुगीजांची सत्ता नेहरुंनी मानली नव्हती, याचे कारण डच व पोर्तुगीज हे 'भाण्डवलशाही' देश होते.

नेहरु पाकिस्तानशी कसे वागले यावरुनही त्यांची भूमिका स्पष्ट होते. पाकिस्तान कम्युनिस्टविरोधी अमेरिकाप्रणीत सैनिक व्यूहात सामिल होण्याच्या आधी नेहरुंना पाकिस्तानबद्दल अत्यंत सहानुभूति वाटत होती. पूर्व पाकिस्तान मधून हिंदू शरणार्थी येत आहेत त्यांचे आगमन थोपविण्यासाठी पाकिस्तानवर लष्करी कारवाई करावी व जास्तीच्या लोकसंख्येला वसविण्यासाठी अधिक भूमीची मागणी करावी ही सरदार पटेलांची सूचना नेहरुंनी मानली नाही व पाकिस्तानातून हिन्दू शरणार्थीच केवळ नव्हे तर मुस्लिम घुसखोरांची देखील आवक थांबविण्यास संमति दिली नाही, आज मुलायमसिंग मुस्लिम घुसखोरांचे समर्थन करीत आहेत त्यात नवीन काहीच नाही, नेहरुनीतीचाच ते पुनरुच्चार करीत आहेत. महम्मदअली हे पाकिस्तानचे पंतप्रधान भारतात वाटाघाटी करायला आले तेव्हा नेहरुंनी काश्मीरचे उदक त्यांच्या हातावर सोडायचे कबूल केले होते असे गोपाल यांनी आपल्या नेहरुमाहात्म्यात निवेदन केले आहे.

काश्मीरचे उदक पाकिस्तानच्या हातावर सोडण्याचा नेहरुंचा विचार बदलण्याचे कारण पाकिस्तान उघडपणे 'भांडवलशाही' देशांच्या गटात सामिल झाला हे होते व नेहरुंनी तसे स्पष्टच सांगितले.

### नेहरुंचे कम्युनिस्टप्रेम

नेहरु मुघल हे राष्ट्रीय राज्यकर्ते होते असे म्हणत. त्यांच्या मते शिवाजीला स्वराज्य संस्थापक म्हणणे बरोबर नव्हते. कारण मुघलांचे राज्य हे स्वराज्यच होते. मुघलांचे राज्य हे जर स्वराज्य तर जे पाकिस्तानी, संस्कृतीने व वंशाने मुघलांपेक्षा आपल्याला अत्यंत जवळचे आहेत त्यांचे राज्य हे स्वराज्य नव्हे असे मानता येत नाही. त्यामुळे कम्युनिस्ट आक्रमण हे आक्रमण नसून विमोचन आहे असे नेहरु मानीत त्याचप्रमाणे पाकिस्तानचे आक्रमण हे आक्रमण नसून भारतातल्या एका गटाने दुसऱ्या गटापासून सत्ता हिसकण्याचा अंतर्गत

प्रकार होईल. तेव्हा पाकिस्तानचे आक्रमण थोपविण्यास राष्ट्रवादासारख्या शक्ति प्रेरक नसून भारतातल्या सत्ताधारी गटाचा स्वार्थ हाच केवळ प्रेरक आहे. पण एकूण भारतीय जनतेला भारतातील सत्ताधारी गटाचा स्वार्थ व पाकिस्तानातील सत्ताधारी गटाचा स्वार्थ यात भेद करण्याचे कारण नाही, अशी नेहरुंची भूमिका होती.

भारतातील इतर सत्ताधारी गटापेक्षा नेहरू स्वत:ला वेगळे मानत होते. कारण तत्वज्ञानाने ते कम्युनिस्ट असल्यामुळे त्यांची सत्ता 'पुरोगामी' होती. पाकिस्तानने भारत जिंकला तर नेहरुंच्या 'पुरोगामी' सत्तेऐवजी पाकिस्तानातील' 'प्रतिगामी' शक्तींच्या हाती सत्ता जाईल. पण पाकिस्तान जर कम्युनिस्ट झाला तर पाकिस्तानातील सत्ताधारी गटाचे आक्रमण हे इतर कम्युनिस्ट देशांच्या आक्रमणाप्रमाणेच आक्रमण न राहता 'विमोचन' होईल.

वरील तथ्ये विचारात घेतली तर चीन व पाकिस्तान या दोन्ही भारताच्या संभाव्य शत्रूंच्या विरुद्ध भारताच्या संरक्षणाची तजवीज करण्यात नेहरुंना पोटतिडिक का वाटत नव्हती हे स्पष्ट आहे. आपण पंतप्रधान आहोत तोपर्यंत भारत, चीन वार पाकिस्तानच्या हाती जाऊ नये एवढाच उद्देश होता. आयुष्याच्या शेवटी शेवटी आपली कन्या इंदिराही आपल्या मागे सहज पंतप्रधान होऊ शकते अशी लक्षणे दिसू लागल्यावर भारताच्या रक्षणाचा काल त्यांच्या दृष्टीने आणखी एका पिढी पुढे ढकलला गेला. आपल्या नंतर काँग्रेसच्या ज्या इतर पुढाऱ्यांना ते 'गोबर-संस्कृतीचे' म्हणत त्यांच्या हाती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या हाती सत्ता जाण्याचा त्यांना संभव दिसला असता तर भारताच्या रक्षणाची आणखी एका पिढीसाठी तरतूद करण्याची देखील त्यांना गरज वाटली नसती.

भारताचे बाह्य शत्रूपासून संरक्षण करण्यात नेहरुंना आस्था वाटली नाही. त्याचप्रमाणे अंतर्गत शत्रूपासून संरक्षण करण्याचीही वाटली नाही, कारण हे अंतर्गत शत्रू देखील एक तर कम्युनिस्ट होते वा मुसलमान होते. भारत स्वतंत्र झाला तेव्हा भारत अजूनही भाण्डवलशाही व क्रांतीचा शत्रूच आहे, ब्रिटिश गेल्यामुळे त्यात काहीच फरक पडला नाही अशी भूमिका धारण करुन कम्युनिस्टांनी तेलंगण, महाराष्ट्र, केरळ, तामिळनाडू वगैरेमध्ये बंडे सुरु केली.

पण कोणत्याही देशात बंडखोरांना जी वागणूक दिली जाते ती या बंडखोरांना देण्यास नेहरु तयार नव्हते. राजगोपालाचारी कम्युनिस्टांचे निखन्दन करावे असे म्हणणारे होते पण नेहरुंनी त्यांचे ऐकले नाही व ज्या कम्युनिस्टांना न्यायालयांनी सजा फर्मावल्या होत्या त्यांच्या साऱ्या सजा त्यांनी माफ केल्या.

आज बोकाळलेले नक्षलवादी याच कम्युनिस्टांचे सगेसोयरे आहेत. त्यांच्याविरुद्ध कारवाई न करता सरकार त्यांच्याशी वाटाघाटी करते हा नेहरु धोरणांचाच वारसा आहे.

नेहरुंनी याच्या अगदी उलट वर्तन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बाबतीत केले. गोडसे हा कधी काळी संघाचा सदस्य होता एवढ्यावरुन त्यांनी संघावरच गांधीच्या हत्येचा आरोप ठेवला.

**नागांचे ख्रिस्तीकरण**

हा आरोप जनतेला एका कुभांडासारखा वाटला नाही. कारण स्वराज्यापूर्वी संघवाले गांधीवर बरीच निर्बुद्ध टीका करीत असत. ही टीकेची बाब सोडली तर कायद्याच्या कक्षेत राहूनच सर्व कार्य करायचे ही संघाची सतत भूमिका राहिलेली आहे. या बाबतीत संघ गांधींपेक्षाही अधिक अहिंसावादी होता. श्री. वसंत तांबे यांनी एकदा हेडगेवारांना पत्र लिहून 'माझी जन्मठेप' हे मुंबई सरकारने जप्त केलेले पुस्तक आपल्याला वाचायला मिळावे म्हणून इच्छा प्रदर्शित केली. तेव्हा हेडगेवारांनी त्यांना लिहिले की जप्तीत असलेली पुस्तके वाचून मन क्षुब्ध करुन घेण्यापेक्षा कायद्याच्या कक्षेत राहूनच काय करणे शक्य आहे याचा विचार करावा. या धोरणानुसार चालणाऱ्या

संघाने म. गांधींचा खून घडवून आणला असा आरोप करणे हे कुभांडाशिवाय काही नाही हे नेहरू ओळखून होते. डॉ. राधाकृष्णन् यांनी त्यांना ऑक्सफर्डहून पत्र लिहून निराधार आरोप करुन संघासारख्या संस्थेवर बंदी आणणे राष्ट्रहिताचे होणार नाही असे आपले मत कळविले. सरदार पटेलांचेही असेच मत होते. पण नेहरुंनी एवढ्या मोठ्या मान्यवरांची काहीच पर्वा न करता संघावरील बंदी कायम ठेवली व अनेक स्वयंसेवकांना देशोधडीला लावले.

संघाचा अपराध काय होता? संघ हिंदूना आपण हिंदू आहोत याचा अभिमान बाळगायला शिकवीत होता. नेहरुंच्या लेखी हिंदू ही एक शिवी होती व हिंदूंना स्वाभिमान शिकविणे हा सर्वात मोठा गुन्हा होता.

संघस्वयंसेवक हिंदू होते हा त्यांचा सर्वात मोठा गुन्हा तर बंड करणारे नागा हिंदूंचे ख्रिस्ती झाले होते हे त्यांचे नेहरुंच्या दृष्टीने मोठे पूजनीय कृत्य होते. हे नागा आम्ही भारतीयच नाही. आम्हाला भारतापासून विभक्त व्हायचे आहे म्हणून सरकारविरुद्ध बंड करुन उठले होते. हिंदू नागा या बंडात सामिल नव्हते. बंड अहिंदूंचे असल्यामुळे नेहरुंच्या दृष्टीने ते दंडनीय नसून महनीय कृत्य ठरले. त्यांनी नागांच्या विरुद्ध कठोर उपाययोजना करु नये अशी सैन्याला ताकीद दिली, नागांचे वेगळे राज्य निर्माण केले व नागा कोट्यधीश असला तरी त्याला आयकर द्यावा लागू नये अशी तरतूद केली.

नेहरुंच्या हिंदू द्वेषाचे व ख्रिस्ती प्रेमाचे उघड कारण आहे. हिंदूंना भारताबाहेर कोणी वाली नाही. उलट जगभरातील प्रबळ राष्ट्रे ख्रिस्ती आहेत. तेव्हा ख्रिस्त्यांचे लांगूलचालन केल्यास ही राष्ट्रे आपल्याला आपला पुढारी मानतील अशी नेहरुंची अटकळ होती.

नागांच्या बंडखोरीकडेच केवळ नेहरुंनी दुर्लक्ष केले नसून त्यांचे ख्रिस्तीकरण करण्यातही नेहरुंचा मोठा हात होता. फादर एल्विन हा मिशनरी नेहरुंचा नागांच्या बाबतीतला सल्लागार होता. मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री रविशंकर शुक्ल यांनी मिशनऱ्यांच्या कारवायांना आळा घालण्यासाठी न्यायमूर्ती नियोगींच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला. यावर नेहरुंची शुक्ल नियोगी यांच्यावर खप्पामर्जी झाली व त्यांनी मुख्यमंत्रिपदावरुन डच्चू दिला.

ख्रिस्त्यांना ज्या प्रमाणे भारताच्या बाहेर वाली आहेत त्याप्रमाणे मुसलमानांनाही आहेत. नेहरुंना भारताच्या बाहेरील मुस्लिम देशांनी आपल्याला इस्लामचा रक्षणकर्ता मानावे अशी महत्वाकांक्षा होती. पाकिस्तानातील मुस्लिम घुसखोर भारतात वसविणे, पाकिस्तानच्या हातावर काश्मीरचे उदक सोडणे या कृत्यांच्या मागे भारताबाहेरील मुस्लिम जगाकडून पाठ थोपटून घेणे हाच नेहरुंचा उद्देश होता. या उद्देशाच्या दृष्टीनेच दंग्यामध्ये नेहमी हिंदूच आक्रमक असतात असा नेहरुंनी प्रचार केला.

**नव्वद कोटींच्या भारतात मनुष्यबळाची कमतरता**

पण दंग्यानंतर जे चौकशी आयोग बसविण्यात येत त्यांचा निष्कर्ष याच्या अगदी उलट असे. त्यात बहुधा आधी आगळिक मुसलमानांनी केली असा आरोप असे. म्हणून नेहरुंनी या आयोगांचे बहुतेक अहवाल प्रकाशित होऊ दिले नाहीत. उलट दंगे आवरण्यासाठी पोलीस जो वेळोवेळी बलप्रयोग करीत त्याची मात्र चौकशी झाली पाहिजे असा नेहरुंचा आग्रह असे. अशा चौकशीने पोलिसावर अविश्वास दाखविण्यासारखे होऊन त्यांची कार्यक्षमता घटते म्हणून खास काही कारण असल्याशिवाय अशा चौकशा करु नयेत असे ज्या प्रांतात दंगे होत त्यांच्या मुख्य मंत्र्यांचे मत असे.

हेच मत पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत महाराष्ट्रीयांवर गोळीबार झाला तेव्हा चौकशी करण्याचे नाकारताना नेहरुंनी केला. महाराष्ट्रीयांवर गोळीबार करताना पोलिसांची बाजू न्याय्य असते. मुसलमानांवर गोळीबार करताना मात्र ती न्याय्य नसते असे नेहरुंचे तर्कशास्त्र होते.

नेहरुंचे दंग्यासंबंधीचे हेच धोरण त्यांच्या तत्त्वावर चालणाऱ्या सरकारांनी गेली ५० वर्षे अवलंबिले आहे. मुसलमानांनी हल्ला केल्यामुळे पोलिसांना बलप्रयोग करावा लागला तर सरकार अशा बलप्रयोगात जखमी झालेल्यांना नुकसान भरपाई देते. तुमच्यावर ज्या अर्थी पोलिसांनी बलप्रयोग केला त्याअर्थी तुमचा दंग्यात सहभाग होता असा आरोप दुसरे कोणतेही सरकार ठेवील.

या नीतीमुळेच स्वराज्यानंतर हिंदू / मुसलमान दंग्यांची संख्या व त्यांची घातकता वाढली. मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटाइतका मोठा बॉम्बस्फोट ब्रिटिश काळात कोणत्याही हिंदु मुसलमान दंग्यात झाला नाही. सरकारच्या केवळ अप्रत्यक्ष उत्तेजनामुळेच नव्हे तर मोठमोठ्या राजकारण्यांच्या घातपाती लोकांशी असलेल्या साटेलोट्यामुळे असली नृशंस कृत्ये होतात असे आरोप सरकारी अहवालातच केलेले आहेत. पण असे अहवाल प्रसिद्ध करुन त्यात कोणाची नावे आहेत हे मात्र सरकार अजून सांगत नाही.

केवळ दंगेच नव्हे तर इतर वेळी देखील पाकिस्तानप्रणीत दहशतवाद्यांचा धुमाकूळ भारतात सुरु

**(पान ४२ वर पहा)**

सौंदर्याची पूजा होत नाही तर पारध होते. तेव्हा तुझ्या जिवाला नेहमीच धोका आहे.

कांचनमृगाने शांत चित्ताने ब्रम्हर्षीचे बोलणे ऐकून घेतले. त्यात बरेच तथ्य होते. तरीपण त्याने आपली खरी व्यथा ब्रम्हर्षीला बोलून दाखविली. तो म्हणाला, 'भगवन् ! माझ्या जिवाची भीती वाटत नाही. पण माझ्या वंशजाकडून एक महापातक घडले आहे. त्याची टोचणी सारखं मन पोखरत असते. तो कलंक, ते पाप कोणते पाप?' त्याचे बोलणे मध्येच तोडून ब्रम्हर्षींनी विचारले. कांचनमृग उत्तरला.

महाराज! सीतामाईसारखी साध्वी वनवासात असताना माझ्या वंशजाने आपल्या सौंदर्याने तिला भूरळ घातली आणि पुढचे दु:खद रामायण घडले. माझ्या वंशजाचे हे पाप व जीवघेणी बोंच मला विसरता येत नाही. महाराज ! मी काय करु? पापक्षालन कसे करु? ब्रम्हर्षीने त्याला थोपटून शांत केले आणि अत्यंत मृदु स्वरांत म्हणाले, 'वत्सा ! यांत तुझ्या वंशजाचा मुळीच दोष नाही. हा सर्व दोष कपटी रावणाचा आहे. सत्यम् शिवम् सारखं अध्यात्मिक सनातन तत्त्व त्याने पायाखाली तुडविलं. पुढे त्याची त्याला शिक्षाही आली. सुंदरम् हे मोहक अध्यात्मिक तत्त्व आधिभौतिक व क्षणभंगूर मोहाशी जोडण्याचे महत्पाप रावणाने केले. सत्य दाहक असते हे तो विसरला आणि ते न पचविता आल्याने शिव संहारक बनला. शेवटी रावण क्रुर काळाचे भक्ष्य बनला. वत्सा! सौंदर्य हे परमेश्वराचेच अंग आहे हे कदापि विसरु नको.

ब्रम्हर्षीचे धीर देणारे शब्द ऐकून त्याचा ब्रम्हर्षीविषयी आदर दुणावला. त्यांच्या वैखरींत विश्वानंद लपला आहे. असे त्याला मनोमन वाटले. आनंदा टूणकन उडी मारुन आजुबाजूच्या वनश्रीच्या वैभवात तो केव्हां विलीन झाला हे कुणालाच कळले नाही.

ब्रम्हर्षी आश्रमाकडे चालू लागले. चालता चालता त्यांच्या मनांत विचार आला.

कस्तुरीमृग आणि कांचनमृग. दोन्हीही हरिणेच. कस्तुरीमृगाला बाह्य सौंदर्य नाही पण आत्मिक सुगंध आहे. कांचनमृगाला बाह्य सौंदर्य आहे तर अंतर्यामी पापाची टोचणी. दोघेही दु:खी.

सूर्य बराच वर आला होता. संपत आलेल्या उन्हाळ्याची काहिली जाणवत होती. इतक्यात दूर कुठे तरी मृगजळाचा भास झाला आणि गीतेतील आठव्या अध्यायातील पंधराव्या श्लोकाची एकदम आठवण झाली. जन्म अशाश्वत व निवास अनित्य आहे याची जाणीव मृगजळाने करुन दिली. एव्हाना ब्रम्हर्षी आश्रमाजवळ येऊन पोहोचले होते.

इतक्यात जोराची वाऱ्याची झुळूक व पावसाची लहानशी सर येऊन गेली. अरेच्या ! मृग नक्षत्र लागले आहे हे मी विसरलोच असं ते स्वत:शीच पुटपुटले. मृगजळाबरोबरची काहिली मृग नक्षत्राच्या एकाच सरीने क्षणांत नाहीशी केली. त्यांच्या मनांत विचार आला. दयाळू निसर्गाने मृगजळ निर्माण केले असेल पण त्याचबरोबर मृगनक्षत्राची सरही मानवाला बहाल केली आहे.

ब्रम्हर्षी आश्रमाच्या ओट्यावर थोडा वेळ बसले. सकाळपासून घडलेल्या घटना त्यांच्या मन:चक्षूसमोरुन सरकू लागल्या.

नुकत्याच पडलेल्या पावसाच्या सरीने मृद्‌गंध नवीन उत्साह निर्माण करीत होता. त्यांत बकुल, प्राजक्त आणि सोनचाफा यांचा सुगंध मिसळल्यामुळे त्यांच्या मनोवृत्ती बहरुन आल्या. जगनियंत्या परमेश्वराचे दयार्द्र रुप त्यांच्या अंत:करणाला सुखावीत होते.

'शुभं भवतु' 'शुभं भवतु' चे निनाद त्यांना ऐकू येऊ लागले पण ते कोठून येत आहेत हे त्यांना कळेना

सुगंध कोठून येत आहे हे कस्तुरीमृगाला तरी कुठे कळले होते ?

❀

## (पान १२ वरून भारताच्या सुरक्षेला अंतर्बाह्य धोके)

असतो. या दशहशतवाद्यांनी पाकिस्तानकडून पैसे घ्यावे, भारतातही लुटमार करुन गब्बर व्हावे व मग शस्त्रे टाकून शरण यावे. शरण आल्यावर गरीब बिचारे रोजगार मिळत नाहीत म्हणून अतिरेकी व दहशतवादी होतात, तेव्हा त्यांचे पुनर्वसन केले पाहिजे म्हणून आमचे सरकार कोट्यवधी रुपये खर्च करते. याला दंगे माजविण्याचा योजनाबद्ध कार्यक्रम म्हणू नये तर काय म्हणावे?

सारांश गेली ५० वर्षे आमच्या सरकारची धोरणे आमच्या सुरक्षेला अंतर्गत व बहिर्गत धोके जास्तीत जास्त कसे निर्माण होतील या हेतूनेच आखण्यात आली आहेत असे दिसते. यावरील धोक्यांच्या जोडीला आता ९०० कोटींच्या या देशात, मनुष्यबळाची कमतरता भासू लागली आहे ही आमच्या करंटेपणाची वार्ता ऐकून पुष्कळ लोक हतबुद्ध होतील. जेव्हा भारताची लोकसंख्या आताच्या अर्धी देखील नव्हती तेव्हा इंग्रजांनी २५ लक्षाचे सैन्य या देशात उभारले होते. आणखी सैन्य उभारले तर मनुष्यबळ कमी पडेल असे त्यांना कधी वाटले नाही. पण आज आमच्या सरकारला ८ लक्षाच्या घरात सैन्य उभारण्यासही मनुष्यबळाची कमतरता भासू लागली आहे. या करंटेपणाचे कारण आमचे इंग्रजीदास्य हे आहे.)इंग्रज कोणत्याही धडधाकट माणसाला सैनिक बनवायला तयार होते मग तो अगदी निरक्षर का असेना. पण आमच्या गांवठी साहेबांना जवानांना देखील इंग्रजी आले पाहिजे असे वाटते. त्यामुळे त्यांनी आठ वर्षे शिक्षण घेतलेल्यांनाच फक्त सैन्यात शिपाई म्हणून भरती होता येईल असा नियम केला. ८ वर्षे शिक्षण घेतलेल्याना थोडेतरी इंग्रजी येत असते हे हा नियम करण्याच्या मागचे कारण आहे. सैन्याच्या मेसमध्ये म्हणजे खाणावळीमध्ये वाढप्याचे म्हणजे वेटरचे काम करणाऱ्याला देखील इंग्रजी आले पाहिजे असा आग्रह धरुन त्यांच्यासाठी बटलर इंग्रजी आवश्यक केल्याच्या तक्रारी मी ऐकल्या आहेत.

ज्या देशात इतकी निरक्षरता आहे की या शतकाच्या शेवटपर्यंत साऱ्या जगातील निरक्षरांचे ५५% निरक्षर तिथे राहणार आहेत असे सांगण्यात येते, त्या देशात आठ वर्षे शिक्षण घेतलेले किती लोक असणार ? आमच्या सैन्याला लोकसंख्येचा उपयोग न करण्याची प्रतिज्ञा करूनच हा नियम केला आहे असे वाटल्याशिवाय राहत नाही.

केवळ शिपायांच्याच नव्हे तर अधिकाऱ्यांच्याही संख्येची आमच्या सैन्याला चणचण भासते आहे. २५००० जवानांची स्थानाप्रमाणेच १२००० अधिकाऱ्यांची स्थाने देखील रिक्त आहेत. ब्रिटिशांचे महायुद्धकालीन सैन्य आजच्या आमच्या सैन्याच्या तिप्पट असून देखील त्यांना अधिकाऱ्यांची कमतरता पडली नाही. ही कमतरता आज पडण्याचे कारण देखील आमचे इंग्रजीदास्य हेच आहे. अधिकारी पदासाठी निवड होण्याच्या आधी प्रत्येक उमेदवाराला लोकसेवा आयोगाची इंग्रजीची परीक्षा द्यावीच लागते व या परीक्षेत अपेक्षित असेलेले इंग्रजीचे ज्ञान मातृभाषेच्या माध्यमातून शिकलेल्या विद्यार्थ्याला असत नाही. १५ वर्षाच्या आत इंग्रजीचे उच्चाटण करण्याचा संविधानाचा आदेश धुडकावून नेहरुंनी इंग्रजीचे प्रस्थ वाढविले व इंग्रजीचे उच्चाटण करण्याऐवजी साऱ्या क्षेत्रातून देशी भाषांचेच उच्चाटण केले. तेव्हा आमच्या सैन्याला भासणाऱ्या संख्येच्या चणचणीचे कारणही मुळात नेहरुवादातातच शोधावे लागते.